प्रेसनोट                                   दिनांक १४/०६/२०२२

सहायक राज्यकर आयुक्त, विक्रीकर विभाग, वस्तु व सेवा कर, ठाणे यांना लाच स्विकारताना ला.प्र.वि.ठाणे विभागाकडुन ताब्यात घेतले बाबत.

| क्र | घटक | ला.प्र.वि.ठाणे |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | ठाणे नगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर |
| २ | लोकसेवकांचे नाव व कार्यालय | श्री. धनंजय जनार्दन शिरसाठ, सहायक राज्यकर आयुक्त, विक्रीकर विभाग, वस्तु व सेवा कर, ठाणे |
| ३ | मागीतलेली लाचेची रक्कम | ३०,००,०००/— रू |
| ४ | स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,००,००० (वीस लाख)/— रू (पहिला हप्ता) |
| ५ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे कापुरबावडी, ठाणे येथे हॉटेल असून, सदर हॉटेलचे मागील वर्षाचे असेसमेंट न करण्यासाठी व नवीन जीएसटी नंबर काढून देण्याकरीता वरील नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ३० लाख रूपयांची लाचेची मागणी केली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/०६/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये आरोपीत लोकसेवक यांनी ३० लाख रूपयांची लाचेची मागणी करून, त्यातील २० लाख रूपये स्विकारण्याचे निष्पन्न झाल्याने, ला.प्र.वि., ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक श्री. धनंजय जनार्दन शिरसाठ, सहायक राज्यकर आयुक्त, विक्रीकर विभाग, वस्तु व सेवा कर, ठाणे यांचे विरुध्द दिनांक १४/०६/२०२२ रोजी सापळा कारवाई करुन तक्रारदार यांचेकडुन २०,००,०००/—रु (२० लाख रुपये) लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :— मा.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.ठाणे परिक्षेत्र,ठाणे

ला.प्र.वि.ठाणे विभागामार्फत नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास ला.प्र.वि.ठाणे परिक्षेत्र,ठाणे कार्यालय यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्काचा पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे कार्यालय, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेत स्थळ :— acbmaharashtra@ mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net

टोल फ्री नं.:— १०६४

दूरध्वनी क्रं. :— ०२२/२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्सप तक्रार क्र :— ९९३०९९७७००

पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

MHMore

( माया एच.मोरे )
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे